सद्रक्षणाय खलनिग्रहणाय


महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, मुंबई**
वरळी पोलीस ठाणे इमारत, दुसरा मजला, डॉ. ॲनी बेझेंट रोड, वरळी, मुंबई. ४०० ०३०
दुरध्वनी क्र. ०२२–२४९३१७७३. Email id – dcpzone3-.mum@mahapolice.gov.in


दिनांक :– ०७/०९/२०२३

# प्रेस नोट

**नागपाडा पोलीसांकडुन “५ वर्षे ६ महिने वयाच्या मुलीचे रहाते घरातुन कायदेशीर रखवालीतुन अपहरण” या गुन्हयातील चिमुकल्या मुलीस तात्काळ मुक्त करून पाहिजे आरोपीस अटक केलेबाबत...**

| | |
|---|---|
| पोलीस ठाणे | नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई |
| गुन्हा नोंद क्र. व कलम | ७९३/२०२३ कलम ३६३ भादवि |
| गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिनांक ०५/०९/२०२३ रोजी ००.३० वा. ते ०८.३० वाजताचे दरम्यान |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक ०५/०९/२०२३ रोजी ०६.२७ वाजता |
| गुन्हयाचे ठिकाण | रूम नं. ११, कामाठीपुरा, गल्ली नं. १२, नागपाडा, मुंबई – ८ |
| फिर्यादीचे नांव व पत्ता | वय २८ वर्षे, व्यवसाय – गृहिणी, रा.ठी. रूम नं. ११, कामाठीपुरा, गल्ली नं. १२, नागपाडा, मुंबई – ८ |
| आरोपींची संख्या | एक<br>रोतीन घोष, वय ३५ वर्षे |
| गुन्हयाची कार्यपध्दती | **अल्पवयीन मुलीचे रहाते घरातुन कायदेशीर रखवालीतुन अपहरण** |

दिनांक ०५/०९/२०२३ रोजी ००.३० ते ०८.३० वाजताचे दरम्यान इसम नामे रोतीन घोष वय ३५ वर्षे याचे फिर्यादी वय २८ वर्षे हिच्याशी असलेल्या प्रेम संबंधाच्या वादातून फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी, वय ५ वर्षे ६ महिने हिचे फिर्यादीचे राहते घरातून, कायदेशीर रखवालीतून अपहरण केले. फिर्यादी हिने दिनांक ०६/०९/२०२३ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नमुद आरोपी नामे रोतीन घोष वय ३५ वर्षे याचेविरूध्द नागपाडा पो. ठाणे गु.र.क्रं. ७९३/२०२३, कलम – ३६३ भादवि अन्वये तात्काळ गुन्हा नोंदविण्यात आला.

नमुद गुन्हा नोंद होताच गुन्हयाची माहिती मा. वरिष्ठांना देण्यात येवून वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक पोलीस निरीक्षक किरण चौगले सह पथके तयार करण्यात आली. नमुद पथकांमार्फत आरोपीचा तांत्रिक बाबींच्या सहाय्याने तपास करता आरोपी हा इगतपुती, नाशिक येथे असल्याबाबत समजल्यावरून आरोपी हा रेल्वेने मुंबईहुन पूढे कोलकत्ताकडे जात असल्याची शक्यता निर्माण झाली होती. त्याअनुषंगाने जि.आर.पी.एफ. पोलीस स्टेशन, इगतपुरी यांना संपर्क साधून त्यांच्या मदतीने तात्काळ अमृतसर एक्सप्रेस, हावडा एक्सप्रेसची तपासणी केली, परंतु आरोपी व बळीत मुलगी मिळून आली नाही. नेमण्यात आलेल्या पथकांनी सी.एस.टी.रेल्वे स्थानक व एल.टी.टी. कुर्ला रेल्वे स्थानक येथे पूढील चौकशी

केली. त्या दरम्यान एल.टी.टी. कुर्ला रेल्वे स्थानक येथून शालिमार एक्सप्रेस निघाल्याचे समजले. सदर गाडीचा इगतपुरी येथील थांबण्याचा तसेच नमुद आरोपीचे लोकेशन यामध्ये साधर्म असल्याने नमुद आरोपी हा बळीत मुलीस शालिमार एक्सप्रेस मधून घेवून जात असल्याची निश्चित होवु लागले होते. तद्नंतर पोलीस अधिकारी व पथकाने कोणतीही हार न मानता आरोपीचा मागोवा चालू ठेवला. सदर रेल्वेगाडीचा थांबा हा चाळीसगांव, जळगांव येथे असल्याने पोलीस पथकाने जीआरपीएफ पोलीसांची संपर्क साधुन त्यांना आरोपीचा माहिती देवुन त्यांच्या मदतीने नमुद रेल्वेगाडी तपासली, परंतु नमुद आरोपी व बळीत मुलगी मिळुन आले नाहीत. त्यानंतर पोलीस पथकाने नमुद रेल्वे गाडीचा व आरोपीचा तांत्रिक पध्दतीने विश्लेषण करून ते बोधवड, बुलढाणा असे मिळून आले. त्यानंतर शालिमार एक्सप्रेसचे पूढील थांबा स्थानक हे शेगाव, बुलढाणा असल्यामुळे पोलीस पथकाने तात्काळ रेल्वे पोलीस कंट्रोलशी संपर्क साधून नमुद आरोपी व बळीत मुलगी या दोघांचे फोटो व त्यांची माहिती जिआरपीएफ व स्थानिक पोलीसांना पाठवुन त्यांना नमुदचा गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्याचे सांगितले. याशिवाय नमुद आरोपी हा रेल्वे स्टेशनला आल्यावर बाथरूममध्ये लपत असावा त्या अनुषंगाने नमुद रेल्वे गाडीच्या बाथरूमची व आरोपीत इसम इतर ठिकाणी लपून बसु शकतो अशा ठिकाणी बारकाईने तपासणी करावी याबाबत तेथील पोलीस पथकास सूचित केले. स्थानिक पोलीस स्टेशन, शेगाव व तेथील गुन्हे शाखा, जी. आर.पी. यांची मदत मिळवून आरोपी व बळीत मुलगी हिची नमुद शालीमार एक्सप्रेस रेल्वे गाडीची पुन्हा कसून तपासणी करीत असतांना नमुद आरोपी हा बळीत मुलीस घेवून बाथरूम मध्ये लपून बसलेला मिळून आला. नमुद आरोपी व पिडीत बालीकेस जी.आर.पी.एफ पोलीसांनी ताब्यात घेतले. त्यानंतर शेगांव, बुलढाणा येथे नागपाडा पोलीस ठाणेचे पोलीस पथक रवाना झाले. नागपाडा पोलीस ठाणेचे पोलीस पथकाने आरोपीस ताब्यात घेवुन अटक केली व अपहरण झालेल्या मुलीची सुखरूप सुटका केली आहे.

नमुद संवेदनशिल गुन्हा मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, सह पोलीस आयुक्त (का. व सु.) श्री. सत्यनारायण चौधरी, मा. अपोआ, मध्य प्रादेशिक विभाग, श्री. अनिल पारसकर, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ३ श्री. अकबर पठाण यांचे मार्गदर्शनाखाली सपोआ श्रीमती शोभा पिसे, वपोनि. महेशकुमार ठाकूर यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणामध्ये नागपाडा पोलीस पथकाने चिकाटीने हार न मानता अपयश येवुन देखील ५ वर्षे ६ महिन्याचे चिमुकलीस सुरक्षित सोडवुन तिचे आईचे ताब्यात देण्यात यश प्राप्त झाले. नमुद कारवाईत नागपाडा पोलीस ठाणेचे पो.नि. सचिन कदम, पो.नि. किरण चौगुले, सपोनि. सोमनाथ काळे, पोउपनि. ज्ञानेश्वर शेंडगे, सिध्दार्थ यशोद, रामप्रसाद चंदवाडे, विशाल चौधरी, गोरे, नरेश घाग, प्रदिप मराठे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोह. सपाटे, अन्सारी, पोअंम. बुगले, मोते, पाटील, बनसोडे, सुर्वे, चव्हाण व मपोशि. सुजाता सोनावणे यांनी सहभाग व परिश्रम घेतले.

*******

**** Z3/11/2023 ****